सं.फौ.ख.क्र.९८१/२०२४

सरकार / ओमप्रकाश

नि.क्र. १०

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. २ ची जबानी,**

**मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,**

माझे नांव : रामचंद रतिराम चौधरी

वय : ४८ वर्षे, हुद्दा: पोलीस हवालदार

नेमणूक : पोलीस स्टेशन आमगांव, ता.आमगांव, जि.गोंदिया

**सरकार तर्फे सहा. सरकारी अभीयोक्ता श्री आर.डब्ल्यु बोरकर यांच्या मार्फत साक्षदाराचा सरतपास शपथेवर सुरु**

१. मी आरोपींना ओळखतो. प्रस्तुत कामातील गुन्हा रजि. क्रमांक ३४८/२०२४ चा तपास माझ्या कडे सोपविण्यात आला. तपासाच्या दरम्यान मी साक्षदारांचे तपास टिपण नोंदविले. जप्त केलेला मुद्देमालातील एक बाटली रासायनिक विश्लेषणाकरीता पाठविली. आरोपी विरुध्द सबळ पुरावा मिळाल्याने मी न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री ए. पी. बोरकर यांचे मार्फत सुरु–**

२. हे म्हणणे खरे नाही की, जप्त मुद्देमालातील एक बाटली रायासनिक विश्लेषणासाठी पाठविले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, साक्षदारांचे सांगण्यानुसार तपास टिपण नोंदविले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रस्तुत कामी खोटा तपास केला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी विरुध्द कोणताही सबळ पुरावा मिळून आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा व चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

**आमगांव**
**दिनांक : ०३/१०/२०२५**

**(समीर गोपाळ गुणारी)**
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आमगांव**